Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

# मराठवाड्यातील कवींचे मराठी साहित्यातील योगदान

**डॉ. अश्विनी अभिमन भामरे**, मराठी विभाग, श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे भाऊसाहेब ना. स. पाटील साहित्य व मु. फ. मु. अ. वाणिज्य महाविद्यालय, धुळे

**प्रास्ताविक :**

मराठी साहित्यात कविता हा एक महत्त्वपूर्ण आणि प्रभावी साहित्यप्रकार आहे. या प्रकारात मराठवाड्यातील कवितेने देखील भरीव आणि संस्मरणीय योगदान दिले आहे. निजामी राजवटीपासून आधुनिक काळापर्यंतचा काव्यविकास हा एका प्रदीर्घ प्रवासाचा इतिहास आहे. दासगणू आणि दे.ल. महाजन यांच्यापासून सुरू झालेली ही परंपरा आजच्या तरुण कवी दासू वैद्य, विलास पाटील यांच्यापर्यंत अविरतपणे सुरू आहे. मराठवाडा हा एक विशिष्ट भूप्रदेश असून त्याच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक वैशिष्ट्यांचा कवितेवर थेट परिणाम दिसून येतो. साठोत्तरी मराठी कवितेचा विचार करताना, या प्रदेशातील कवींच्या कविता त्यांच्या बोलीभाषा, कोरडवाहू जीवनशैली, स्थानिक संघर्ष, आणि दैनंदिन अनुभवांचा साक्षात्कार घडवतात.

ज्येष्ठ कवी फ.म. शहजिंदे हे यासंदर्भात म्हणतात की, "मराठवाडा हा एक विशिष्ट भूप्रदेश आहे. हे खरे असले तरी तो कोकणासारखा ठळक नाही. मराठवाड्याची बोली ही एक मराठी बोली होऊ शकते, परंतु तिचा स्वतंत्र असा कोष नाही."[१] मराठवाडा हा प्रामुख्याने खेड्यांचा व कोरडवाहू शेतीचा प्रदेश आहे. यामुळे येथे अजूनही व्यावसायिकता रूजलेली नाही. इतिहासाच्या दृष्टिकोनातून पाहता, मराठवाडा इंग्रजांच्या ताब्यात न गेलेल्या निझामशाहीत सुमारे अडीचशे वर्षे होता. त्यामुळे येथे इतर महाराष्ट्रापेक्षा वेगळी सामाजिक जडणघडण घडली. निझामी राजवटीत मराठी वाचन, लेखन आणि भाषण यावर अलिखित निर्बंध होते. उर्दू ही राज्यकारभाराची भाषा होती, तर इतर भाषांना गौण स्थान दिले गेले. रझाकार चळवळीत तर अत्याचारांचा कळस गाठण्यात आला.

संस्थानिक उस्मान अली निझाम यांच्या सरंजामी व्यवस्थेखाली मराठवाड्याची भाषा, साहित्य, संस्कृती आणि स्थानिक जीवन उर्दूच्या वर्चस्वाखाली अक्षरशः भरडून निघाले. अशा परिस्थितीत जन्माला आलेल्या काव्याला केवळ साहित्यिक नव्हे तर सामाजिक आणि ऐतिहासिक प्रतिरोधाचे माध्यम मानले पाहिजे. या भूमीतील कवींची कविता ही फक्त भावनांची अभिव्यक्ती नसून, ती त्यांच्या जीवनप्रवासातील ताणतणाव, अन्याय, उपेक्षा व संघर्षाचे दस्तऐवजीकरण आहे. म्हणूनच मराठवाड्यातील कविता ही केवळ सौंदर्यशास्त्रीय अंगाने नव्हे, तर सामाजिक भान आणि ऐतिहासिक संदर्भांच्या अनुषंगाने समजून घेतली पाहिजे.

कवी शहजिंदे यांच्या या वरील उताऱ्यावरून मराठवाडी आणि तत्कालीन ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात येते. यामुळे तेथील संस्कृती, आचार-विचार, भाषा, बोली, शेती-भाती, रिती-रिवाज या पद्धती देखील लक्षात येतात.

स्वतंत्र्यानंतर मराठवाड्यातील राजकारण, आर्थकारण बदलले त्यामुळे तेथील जीवनशैली बदलली. वाढत्या शहरीकरणामुळे अनेक संस्कृतीत बदल झाला. मराठवाड्यातील मूळचे जीवन हरवत चालले आहे. जीला आपण 'मराठवाडी' म्हणतो, यात प्रामुख्याने जालना, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) या



Copyright © | JET Network, All Rights Reserved

जिल्ह्यातील मराठवाडी बोली-अहिराणी, वैदर्भीय बोलीच्या जवळची आहे. नांदेडच्या मराठवाडी बोलीवर तेलगू बोलीचा प्रभाव आहे. उस्मानाबाद, लातुर जिल्ह्याच्या बोलीवर कन्नड भाषेचा प्रभाव आहे. तसेच संपूर्ण मराठवाडी बोलीवर उर्दूचा अधिक प्रभाव दिसून येतो. अशा काळात मराठवाड्यातील कवींनी मराठी भाषा टिकविण्याचे महत्त्वाचे काम केलेले आहे.

या मध्ये बी. रघुनाथ, वा. रा. कांत, राम पिंगळीकर, यशवंत कानीटकर, लक्ष्मीकांत तांबोळी, गजमल माळी, शिवाजी गऊळकर, ना.धों.महानोर, गोविंद कुलकर्णी, फ.मु.शिंदे, वामन निंबाळकर, नागनाथ कोत्तापल्ले, फ.म. शहजिंदे, अनुराधा पाटील, सुहासिनी इर्लेकर, सोपान हळमकर, इंद्रजीत भालेराव, बापुराव जगताप, भगवान सवाई, जगदिश कदम, चंद्रकांत पाटील, श्रीकांत देशमुख, भालचंद्र नेमाडे, विष्णू सलामपुरे, ऋषिकेश कांबळे, इ. नामावली मराठवाड्यातील साठोत्तरी काळातीलच आहे. तरीही ही कवींची संख्या अधिक प्रमाणात आहे. या कवींनी आपली व्यापक भूमिका कवितेच्या माध्यमातून मांडलेली आहे.

**मराठवाड्यातील प्रमुख कवी :**

**राम शेवाळकर:**

मराठवाड्यातील एक प्रमुख कवी यांनी १९५६ मध्ये 'असोशी' हा निवडक कवितांचा काव्यसंग्रह प्रकाशित केला. या काव्यसंग्रहाला मंगेश पाडगावकरांची प्रस्तावना आहे. या काव्यसंग्रहात प्रथित कवींच्या शैलीचा अनुभव घेण्याचा विशिष्ट लकबीचे ठसे शेवाळकरांच्या काव्यात उमटलेला आहे. याचा प्रत्यय 'असोशी' हा काव्यसंग्रह वाचतांना येतो. प्रेम आणि निसर्ग' यांच्या अनुभूतीचे तरल क्षण शेवाळकर यांच्या बहूतेक कवितातून व्यक्त झालेले आहेत. त्यांचे प्रयोजन सौंदर्य-निर्मितीचे आहे. त्यामुळे त्यांच्या कविता राजकीय आणि सामाजिक प्रसाराचा आक्रोश करीत नाही. तर त्यांच्या एकूणच कविता प्रतिमा निसर्ग आणि मानवी मन यातून रंगून जाते. ते 'करुणा' कवितेत म्हणतात,

'जेव्हापासून माझे नाते
लवलवणाऱ्या
गवताच्या पात्याशी जडले
तेव्हापासून अंतर अवघे
लसलसत्या
पोपटीपणाचे डवरून आले !'[२]

शेवाळकर आपल्या कवितेतून अनुभव लुसलुसत्या कोवळीकतेने व्यक्त करतात. तृण पात्याचा मृदुता आणि पोपटी रंगाचे वैभव त्यांनी अधिक सुंदर आणि सुरेख पद्धतीने रेखाटले आहे.

शेवाळकर निसर्गाबरोबर प्रेमावर देखील काव्य करतात. त्यांच्या बहुतेक प्रेम कविता यौवनातल्या उत्सूक मनातून आली आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेचा उत्कंठता वाढते. काही वेळा तो एकसुरी देखील होते. कारण प्रेमानुभवाच्या विविध छटा त्यांच्या कवितेत दिसत नाहीत. असे असले तरी 'शाप' सारखी कविता संग्रहात वेगळी ठरते. 'शाप' मध्ये ते म्हणतात,

"कधि मी म्हणतो
प्रेमबीम सब मुठांत झुठे
हळवेपण पागलपण दुसरे
रडणे हे भ्याडांचे किंवा



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

दंभखोर पोरांचे लेणे
माया म्हणजे फांस रेशमी
प्रिय, प्रेयसी, प्रेमिक, प्रियकर
हे सारे शब्दापरी भंगुर |"[३]

अशा रितीने प्रेमाला क्षण भंगूर म्हणणारे कवी राम शेवाळकर मात्र स्वतःला निर्दन म्हणतात.

**राम पिंगळीकर:**

राम पिंगळीकर यांचा १९५५ मध्ये 'साद' हा कविता संग्रह प्रसिद्ध झाला. पिंगळीकर हे संत दासू गणांच्या सहवासात असत. त्यांच्या सहवासात त्यांना अनेक काव्य रचना केलेली आहे आणि त्यातूनच कविता जन्माला आली. 'श्रावणमास' या कवितेतून म्हणतात,

'नटला' श्रावणमास
हास्य मिषे नववधूच्या गाली
पुलकित हो उल्हास
सुभगसाज लेवुनि बहुविधा
श्रावणगमी सौंदर्याची रचितेनव आरास"[४]

वरील कवितेत पिंगळीकरांनी निसर्गविषयी वर्णन केलेले आहे. कवितेतून निसर्गाचे सौंदर्य प्रतित केलेले आहे. शब्दरचना एखाद्या पंडिती काव्य सारखी आलेली आहे.

**गजमल माळी:**

१९६० नंतरच्या कालखंडातील गजमल माळी हे महत्त्वाचे कवी म्हणून ओळखले जातात. 'गंधवेणा', 'कामायनी', 'नागफना आणि सूर्य' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. नवोदित कवींचे साहित्य सुलभतेने रसिकांपुढे यावे यासाठी मराठवाडा साहित्य परिषदेने पुरस्कृत ग्रंथ प्रकाशनाची योजना आखली होती. त्या योजनेत 'गंधवेणा' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. गजमल माळी हे निसर्ग मित्रांना प्रेमभावनेची ऊब देतात. ते निसर्गाचे सौंदर्य नसते तर ते एका भाववृत्तीचे सौंदर्य असते. असे त्यांच्या काव्यातून प्रकटतेने जाणवते. गजमल माळी यांच्या 'गंधवेणा' या काव्य संग्रहाच्या प्रस्तावनेत प्रसिद्ध समीक्षक वा.ल.कुलकर्णी म्हणतात, "माळी यांची ही सौंदर्य दृष्टी आज तरी पु.शि.रेगे, बा.सी.मर्ढेकर, वसंत बापट, मंगेश पाडगावकर या सारख्या प्रवृत्तीने थोड्याफार वेगवेगळया असणाऱ्या कवींच्या सौंदर्य दृष्टीवर पोसलेली आहे.'[५] वरील विधान हे वा.ल.कुलकर्णी यांच्या अनुभवातून आणि अनुकरणातून आहे. गजमल माळी यांचा पहिलाच काव्य संग्रह असला तरी त्यांच्या अनुकरणाच्या अनेक खुणा आढळतात याचीही प्रचिते त्यांच्या काव्यसंग्रहातून येते. पहिल्या काव्यसंग्रह 'गंधवेणा' यातून माळीनी निसर्ग आणि प्रेमभाव यांचे स्थान त्यांच्या कवितेत मिळावलेले आहे. म्हणून त्यातल्या निसर्ग चित्रांना प्रेमभावनांची डूब सहजच मिळलेली आहे. त्यांच्या काव्यातून येणारा निसर्ग हा मराठवाड्यातील निसर्ग आहे. त्यामुळे इथला रखरखीतपणा लाभलेला आहे. भेगाळलेली काळी शिवारे, पेरलेल्या डोंगरकळा, वृक्षांचे सापळे, कोरडे जंगल, ओसाळलेले रान यांची गर्दी आहे. या संग्रहातील त्यांची पहिल्याच कवितेत 'अंतराल कोंभ नव्हे' या कवितेत शेवट असा आहे की,

'जळातल्या' चंद्रम्याला
पंख तुझे... तुझे हवे"



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

यातून सभोवतालचे परिसराचे आकर्षण चित्र उभेउभ साकार होते. तर त्यांच्या 'मी' या कवितेत

"माझ्या हृदयाची
एक तार काढ
तुझ्या वीणेला पुरेल अशी"

यातून कवीच्या मनातील हळूवार स्वप्नाळूपणाचा प्रकार झालेला दिसून येतो. याच बरोबर माळी आपल्या काव्यातून लोकगीतांचा वापर देखील तेवढाच करतांना दिसतात. 'वाट चांदणी जळते' या कवितेत.

"इरींग मीरिंग
लवंगा तीरिंग
लवंगा तीरीचा
डुगडुग बाजा
गया गोपिचा
उतरला राजा !"

या पद्धतीने त्यांच्या कवितेत लोभगीतांचा अनुभव देखील दृष्टीस पडतो.

**ना.धों.महानोर:** ना. धों. महानोर यांनी देखील आपल्या काव्यलेखनात मराठवाड्यातील चित्रण केलेले आहे. त्यात त्यांनी काव्यलेखन केलेले आहे. कथाकार, कादंबरीकार, लोक साहित्याचे अभ्यासक म्हणून प्रसिद्ध असलेले महानोर यांचा काव्यपरंपरा देखील विपूल आहे. 'रानातल्या कविता', वही, पडसखडेची गाणी, अजिंठा, प्रार्थना, दयाघना, पानझड इ. काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत.

ना.धो. महानोर यांची कविता ही प्रामुख्याने रानातली कविता आहे. रानातल्या रंग, रूप, लावण्याच्या छटा, रानाचे श्वास, रानावरून घरंगळून जाणारे प्रहर, रानावरचे वर्षाव, रानवाऱ्याचा, रानझऱ्याचा नाद, रानफुलांचा गंध अशा अनेक विध संवेदना तसेच स्त्री लावण्याचा सौंदर्य, स्त्री स्वभावाच्या अनेक छटा किंवा स्त्री पणाचा दर्शनाचा अविष्कार म्हणूनही त्यांच्या काव्यात येतात.

महानोरांच्या कवितेत रान, पीक, ज्वारी, बाजरी, गहू, आणि त्यांची सळसळ, बांधावरली केळी, पक्ष्यांचे लक्ष थवे, चावळ जाणवणारे पाणी, दवातली पहाट, अभाळीचा चंद्र हे सर्व विश्व महानोरांच्या कवितेत येतो. म्हणून शृंगार या रानातून राजरोस येतो. तेव्हा प्रादेशिक शब्द आणि नागर शब्द यांचे समर्थ रसायन या सर्वांची जाणीव महानोरांची कविता करते. म्हणून महानोरांची कविता केवळ ग्रामीणतेत अडकत नाही.

'ग्रीष्माचे उन्ह, ग्रीष्माचे उन एकदा
खेड्यावर आले
खेडे उदास झाले, घरात असेल तेवढे झोळीत
टाकून स्वतः नागडे झाले.

वरील पत्कीतून अतिशय अलिप्त पण सूचक अशा प्रभावी अभिव्यक्तीची येथे जाणीव होते. काही सहज साध्या ओळीतून गडद दुःखानुभवाचा चटका रसिकांपर्यंत पोहचविण्यात महानोर यशस्वी झालेले आहेत.

"ह्या शेताने लळा लाविला असा असा की,
सुख-दुःखाला परस्परांशी हसलो-रडलो



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 14, Issue 4 – Dec 2024 Impact Factor : 7.665
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
UGC CARE I

आता तर हा जीवच अवघा असा जखडला
मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो."[६]

शेती, रान हे महानोरांचे श्रद्धा स्थानच आहे. म्हणून त्यांची कविता रानावर आणि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या माणसांवर आहे. निसर्ग, रान आणि मानवी मन यांच्यावर त्यांची कविता अधोरेखीत करते.

झाडांचे वर्णनही महानोर मोठ्या जिव्हाळ्याने करतात. आंब्याचे झाड मोहराच्या वासाने ओथंबलेले आहे. गाभुळी चिंच नवतीच्या भाराने वाकली आहते. तर कधी एक राजस पाखरू तिच्या मनात भिरभिरने तर कधी तिच्या कानात एक शब्द साळुंखी शब्द पेरते. यामुळे वारंवार येणारे झाडे व पाखरे रसिकांना आकर्षित करतात. तर येणारी लय ही कवितेची प्राण बनते.

महानोरांची कविता अल्पाक्षर रमणीयत्व यामुळे त्यांचे खास वैशिष्ट्ये बनते.

'केळीच्या बनात
चांदण उतरलंय
कमळणबाई
जरा अंगावर पांघर'[७]

किंवा

झाडांच्या सावुल्या
पाण्यात उतरतात
उन्हाची पारी[८]

अशा आकर्षक वर्णनाने त्यांची कविता वाचकांना आपलेसे करून घेते. त्यामुळे त्यांची कविता ही रसिक वाचकांच्या हृदयापर्यंत पोहचते.

**फ.मु.शिंदे:** मराठवाड्यातील प्रमुख कवी फ.मु.शिंदे हे कवी आणि गीतकार म्हणून प्रसिद्ध आहेत. 'जुलुस, आदीम, वृंदगान, अवशेष, प्रार्थना, सार्वमत, दिल्ली ते दिल्ली, फकिराचे अभंग, आई आणि इतर कविता, गाथा, आयुष्य वेचताना, निरंतर, भूकंपाची मरणगाणी, लोकगाणी, मनाचे अभंग, मडकं गेलं फुटुन, सुर्यमुद्रा इ. काव्यसंग्रह त्यांचे प्रसिद्ध आहेत.

'जुलुस' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह, यात त्यांनी स्वतःच एक विद्रोहपण उत्कट असं भावविश्व घेऊन आपणासमोर अवतरला आहे.

या काव्यसंग्रहात इतरांच्या तुलनेत नुसती शब्दांनी भारलेपणाची अवकळा नाही तर, स्वतःच्या जाणीवेतून विद्रोहाचे पेटून निघालेले असे श्वास आहेत. त्यांच्या 'जीवनामा' या पहिल्याच कवितेत म्हणतात,

"जीवांचे पंचनामे रखडताना
रस्त्यावर
काही एक वाटलं नाही
आमचं आम्हाला
हा पंचनामा, तो पंचनामा
इथला... तिथला
खोटा... खरा..."[९]



Copyright © | JET Network, All Rights Reserved

वरील काव्यपंक्तीत कवी शिंदे प्रश्न करतात, जीवाचा पंचनामा रस्त्यावर मांडावा. मन संवेदना हिन झाल्यावर कशाचं काही वाटत नाही. या सोयऱ्यांच्या गर्दीत जीवाचा पंचनामा कुणाकडे पेश करावा. कारण तिथे विश्वास लागतो... नाहीतर मग सुरु होतो तेथे खोटारडेपणा. पुढे ते म्हणतात,

असेच असेल भटकायचे अस्ताच्या काठावरून
तर होऊ या आपणही स्वयंप्रकाशी मार्गावर

अशा आत्मविश्वासाची ठाम भूमिका कवी मांडतो.

'जुलूस' या काव्यासंग्रहाबद्दल पु.ल.देशपांडे म्हणतात, “शिंद्यासारख्या कलावंचांची श्रद्धा मला मोलाचीच नव्हे तर डोळस वाटते आणि म्हणूनच ते आजच्या पराभवावरही प्रेम करु शकतात. उजेडाच्या स्वागताची त्यांना ओढ आहे. कुठेतरी मुक्त व्यथांचा गाव वसनार आहे. यावर त्यांचा विश्वास आहे. तो गाव बसवायला निघालेला कलावंताचा हा जुलूस आहे.”[१०] पु.ल.देशपांडे यांच्या वरील विधानावरून कवी फ.मु.शिंदे यांच्या काव्याची मराठवाड्यातील निसर्ग, प्रेम शेती, गाव इ. परीसराची यथार्थपणे जाणीव होते.

**इतर काही कवी :** भालचंद्र नेमाडे यांनी 'देखणी' आणि 'मेलडी' असे काव्यसंग्रह लिहून मावनी संस्कृतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आशय संतांच्या व्याकुळतेने वाचकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. भ.मा.परसवाळे यांनी आरोह काव्यसंग्रह लिहून आपल्या कवितेतून आणि चित्रातून नेहमीच स्वतःचा शोध आणि मानवी संबंधाच्या मागे असलेल्या वास्तवाचा शोध घेतलेला आहे. केशव वसेकर यांनी 'उर्ध्वगामी', 'तफावत' हे दोन काव्य संग्रह लिहून सामाजिक जाणिवतेचे प्रदर्शन केलेले आहे. त्यांची संकल्पनाच मूळ सामाजिक आहे. समाजाचा प्रवास हा जो ज्या ठिकाणाहून निघाला त्या ठिकाणाकडे होत नाही. तर तो उर्ध्वगामी म्हणजे वरच्या पातळीवर होत असतो. नागनाथ कोत्तापल्ले 'मूडस' या काव्यसंग्रहातून मानवी मनाच्या उदासीनतेचे चित्र अतिशय वास्त आणि प्रखरपणे मांडतात. तेव्हा मनाच्या कोंडमाऱ्याचे मूळ स्वतःच्या थकलेल्यांचे उदास गाणे 'मूडस' यांचे 'निधर्मी, आदम, शेतकरी, ग्वाही हे काव्य संग्रह प्रसिद्ध आहेत. हिंदू-मुस्लिम, सांस्कृतिक काचेतून निर्माण झालेली त्यांची कविता परकेपणाची शोध घेऊन अल्पसंख्याकांची मानसिक घूसमट व्यक्त करतांना दिसते. सामाजिक व्यथा वेदनांनी समाजवास्तवावर प्रहार करून समस्त मुस्लिम मन प्रतिबिंबित करतांना दिसतात. विलास वैद्य यांचे गलफ, आलाफ हे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. रेणू पाचपोर यांचे डाळींबाचे दाणे, अवथर, चांद झुकला पाण्यात हे कवितासंग्रह आहेत. त्यांनी वास्तव आणि मनातील जाणिवा प्रखर पणे मांडलेले आहेत.

**निष्कर्ष :**

१. साठोत्तरी मराठी कवितेच्या प्रवाहाचा विचार करताना *राम शेवाळकरांपासून ते रेणू पाचपोर* यांच्या पर्यंतचा एक समृद्ध प्रवास दिसून येतो. या प्रवासात अनेक कवींनी मराठवाड्याच्या साहित्यविश्वात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे.

२. या कालखंडात *राम शेवाळकर, राम पिंगळीकर, गजमल माळी, ना.धों. महानोर, फ.मु. शिंदे, भालचंद्र नेमाडे* आदी कवींनी आपल्या काव्यलेखनाच्या माध्यमातून मराठवाड्यातील काव्यपरंपरेला बळकटी दिली आणि तिचे स्वरूप समृद्ध केले.



Copyright © | JET Network, All Rights Reserved

३. प्रत्येक कवींने आपल्या कविता *स्थानिक बोलीभाषा* आणि *स्वतःच्या जीवनानुभवांवर* आधारून लिहिल्या आहेत. या कवितांमध्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब उमटते आणि त्यांनी *स्वतःचा स्वतंत्र चेहरा* टिकवून ठेवलेला आहे.

४. मराठवाड्यातील या सर्व कवींनी आपल्या सशक्त लेखनातून मराठवाड्यातील कवितेला वैचारिक, भाषिक आणि भावनिक दृष्ट्या सामर्थ्य प्राप्त करून दिले. ही कविता *एक सामूहिक साहित्यिक चळवळ* ठरली असून यात प्रत्येकाचा सिंहाचा वाटा आहे.

५. या कवितांमध्ये *जीवनातील दुःख, शेती व शेतकरी, ग्रामीण जीवन, नागरी अनुभव, माणूस आणि त्याचे मन, प्रेमभावना, निसर्ग, संस्कृती, निखड रान, जंगल, आणि वास्तवाचे विविध पैलू* अत्यंत ताकदीनं आणि प्रभावी पद्धतीने मांडले गेले आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

१. शहाजिंदे फ.म., (१९९८), ‘मराठवाड्यातील कविता’, निर्मल प्रकाशन, नांदेड, पृ.क्र. १०.
२. शेवाळकर राम, (१९५६), ‘असोशी’, पराग प्रकाशन, पराग सदन, नागपूर, पृ.क्र. २७.
३. तत्रैव, पृ.क्र. २१
४. महाजन दे.ल., (संपादक) (१९६३), ‘मोहर’ मराठवाडा कवी संमेलन, नांदेड, पृ.क्र. ४२.
५. माळी गजमल, (१९६१), ‘गंधखुणा’, मराठवाडा साहित्य परीषद, औरंगाबाद, पृ.क्र. २.
६. महानोर ना.धो. (१९९७), ‘रानातल्या कविता’, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, पृ.क्र. ९.
७. रसाळ डॉ.सुधीर, (१९९६), काही मराठी कवी जाणीव आणि शैली, प्रतिमा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, पृ.क्र. १८.
८. तत्रैव पृ.क्र. ४७.
९. शिंदे, फ.मु., (१९८२), ‘जुलूस’, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ३०.
१०. देशपांडे, पु.ल., (१९७२), ‘अस्मितादर्श’ ऑ.नो.डी. छावणी, औरंगाबाद, पृ.क्र. ३०.



Copyright © | JET Network, All Rights Reserved